शासकीय कार्यालयांना लागणाऱ्या वेगवेगळ्या
वस्तूंच्या उत्पादनांची तपशीलवार माहिती

**महाराष्ट्र शासन अंगीकृत**
**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,**
**१९ / २1 मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२६१७६४१-३**
**ई मेल-** marketing.mahakhadiv@gmail.com / www.mskvib.org

**आदेश क्रमांक** - कार्यासन-५/पणन/नियत किमत दर/परिपत्रक क्र. खाग्रामं/३१३२/दरपत्रक/२०२५-२६
दिनांक-१८/०७/२०२५

**विषय-** मंडळाच्या उत्पादनांची तपशीलवार माहिती ई-पोर्टलवर प्रसिद्ध करण्याबाबत.

**संदर्भ** - १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस २०१४/प्र.क्र. ८२/भाग-३/उद्योग-४/दि/१ डिसेंबर, २०१६
२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग याचे पत्र क्र. भाखंस-२०२०/प्र.क्र.५७/उद्योग-४ दि २० जुलै, २०२०
३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. भाखंस-२०२१/प्र.क्र.३१/उद्योग-४ दि २८ एप्रिल, २०२१
४) कार्यासन-६/पणन/धोरण/६६२५ दि.१३ मार्च २०२३ रोजीचे परिपत्रक

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना महाराष्ट्रातील ग्रामीण व सुक्ष्म उद्योजकांना उद्योग उभारणी व उद्योग सुरळीत सुरु राहण्यासाठी मागील व पुढील दुवे उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात आली आहे. शासनाच्या विविध विभागांना लागणाऱ्या वस्तूंच्या खरेदीसाठी स्वतंत्र खरेदी धोरण उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस २०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४/दि/१ डिसेंबर, २०१६ परिशिष्ठ-२० मध्ये शासकीय महामंडळे उपक्रमामार्फत खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी दिलेली आहे. शासन निर्णयातील परिच्छेद ५.१७ नुसार महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्याकडे नोंदणीकृत संस्था / उद्योजक यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची तपशीलवार माहिती दर वर्षी ३१ मार्च पूर्वी ई-पोर्टलवर (www.mskvib.org) प्रदर्शित करावी असे नमूद केले आहे.

त्याअंनुषंगाने सोबतच्या तक्त्यात परिशिष्ट संदर्भ क्र.१ मध्ये खरेदी धोरणातील ५.१७ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकरिता परिशिष्ट २० मध्ये नमूद केलेल्या वस्तूंचे दर प्रसिद्ध केलेले आहे.सदर दराची विधिग्राह्यता दि.३०/०६/२०२६ पर्यंन्त मान्यतेसह ई-पोर्टलवर (www.mskvib.org) ग्राह्य राहतील.

नित्यानंद पाटील
उप मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.